# महाराष्ट्र लोकसेवा आयोग

## MAHARASHTRA PUBLIC SERVICE COMMISSION

बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, महात्मा गांधी मार्ग, हुतात्मा चौक, मुंबई ४००००१ ☎ २२६७ ०२१० /१४८ /२४८,२२६०२२२२ फॅक्स : २२६७३९१५

Bank of India Bldg, 3rd floor, Mahatma Gandhi Road, Hutatma Chowk, Mumbai ४००००१ ☎ २२६७ ०२१० /१४८ /२४८, २२६०२२२२ Fax : २२६७३९१५

**ई-मेल** - sec_mpsc@maharashtra.gov.in **वेबसाईट** - www.mpsc.gov.in, www.mpsconline.gov.in


### प्राध्यापक- नेफ्रॉलॉजी (Professor in Nephrology), शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, महाराष्ट्र वैद्यकीय शिक्षण व संशोधन सेवा, गट-अ

**धारिका क्रमांक : ८३७(१)(४)/११८७३/दहा** **जाहिरात क्रमांक:३६१/२०१३**

आयोगामार्फत महाराष्ट्र शासनाच्या आस्थापनेवरील **प्राध्यापक- नेफ्रॉलॉजी (Professor in Nephrology), शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, महाराष्ट्र वैद्यकीय शिक्षण व संशोधन सेवा, गट-अ** च्या दोन पदांसाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. या पदासाठी खालील अटी व अर्हतांची पूर्तता करणारे उमेदवार अर्ज करू शकतात.

२. **उपलब्ध पदसंख्या :-**

| एकूण पदसंख्या | अमागास | अनुसुचित जाती |
|---|---|---|
| २ | १ | १ अनुशेषाचे पद |

२.१ वर नमूद केलेल्या पदसंख्येत व आरक्षणामध्ये शासनाच्या संबंधित विभागाच्या सुचनेनुसार बदल होण्याची शक्यता आहे.

२.२ विचाराधीन पदाकरिता अपगांसाठी पद आरक्षित नसले तरी , शासन निर्णय, क्र. एमईएस/१२०२/(८१) वैसेवा-१, दि. १९ ऑगस्ट, २००५ नुसार. तसेच शासन निर्णय क्र. न्यायाप्र/२००९/प्र. क्र.९/सुधार -३ दि.१३ ऑगस्ट २००९ च्या अनुषंगाने १) अंधत्व किंवा क्षीणदृष्टी (Blindness or Low Vision) २) चलनवलन विषयक विकलांगता व मेंदूचा अर्धांगवायू (Locomotor Disability or Cerebral Palsy) असे अपंगत्व असलेले उपरोक्त वर्गवारीतील उमेदवार प्रस्तुत पदासाठी अर्ज करु शकतात.

३. **वेतनश्रेणी : :** रु.३७,४००-६७,०००+ ग्रेड पे रु.१०,०००/- व इतर भत्ते.

४. **पात्रता- उमेदवार भारतीय नागरिक असावा.**

**४.१ वय- दिनांक १ जुलै, २०१३ रोजी अमागासवर्गवारीकरिता ४० व मागासवर्गवारीकरिता ४५ वर्षा पेक्षा जास्त नसावे.**

४.२ महाराष्ट्र शासनाच्या सेवेत नियमित नियुक्ती झालेल्या कर्मचा-यांना उच्च वयोमर्यादा लागू नाही.

४.३ शासन आदेशानुसार संबंधित आरक्षित प्रवर्ग / उपप्रवर्गासाठी वयोमर्यादा शिथिलक्षम राहील.

४.४ शासन आदेशानुसार माजी सैनिक, अपंग व खेळाडू इत्यादीसाठी वयोमर्यादा शिथिलक्षम राहील.

४.५ अपवादात्मक शैक्षणिक अर्हता किंवा अनुभव किंवा दोन्ही धारण करणा-या उमेदवारांच्या बाबतीत उच्च वयोमर्यादा शिथिल करण्याविषयी आयोगाकडून विचार करण्यात येईल. परंतु आयोगाच्या कार्यनियमावलीतील प्रमाणानुसार जेव्हा मुलाखतीसाठी उमेदवार प्राप्त होत नसतील तेव्हाच हा नियम विचारात घेतला जाईल.अशा प्रत्येक प्रकरणी उपलब्ध उमेदवारांच्या उच्चतम शैक्षणिक अर्हतेच्या दोन स्तर उच्च शैक्षणिक अर्हताप्राप्त उमेदवारच वयोमर्यादेत सवलतीकरीता विचारात घेतले जातील. अनुभवाच्या संदर्भात ज्या पदावरील किमान अनुभव मागितला असेल त्यापेक्षा वरीष्ठ पदावरील अनुभव वयोमर्यादा शिथिलीकरणास्तव विचारात घेतला जाईल.

४.६ **शैक्षणिक अर्हता :-D.M.(Nephrology) AND**

४.७ **अनुभव :- Possess experience of teaching in the relevant subject for not less than 4 years as Reader/Associate Professor in a recognised Medical College/Teaching Institution .**

४.८ **Preference may be given to the candidates, who have Minimum of four research publications indexed in index medicus/national journal and one research publication in International Journal.**

५. प्रस्तुत जाहिरातीमध्ये नमूद केलेली शैक्षणिक अर्हता, अनुभव इत्यादी अर्हता किमान असून, किमान अर्हता धारण केली म्हणून उमेदवार मुलाखतीस बोलाविण्याकरिता पात्र असणार नाही. जाहिरातीस अनुसरून प्राप्त झालेल्या अर्जाची संख्या वाजवी प्रमाणापेक्षा जास्त असेल आणि अर्ज सादर केलेल्या सर्व उमेदवारांच्या मुलाखती घेणे सोईस्कर नसल्यास मुलाखतीसाठी उमेदवारांची संख्या मर्यादित करण्याच्या दृष्टीने जाहिरातीत दिलेल्या शैक्षणिक अर्हता आणि/अथवा अनुभव यापेक्षा जादा शैक्षणिक अर्हता/अनुभव यांच्या आधारे निकष निश्चित करून अथवा चाळणी परीक्षेद्वारे मुलाखतीस पात्र उमेदवारांची संख्या मर्यादित करण्यात येईल. चाळणी परीक्षा घेण्याचे निश्चित झाल्यास, अर्हता आणि / अथवा अनुभव शिथिल केला जाणार नाही. चाळणी परिक्षेचा अभ्यासक्रम, परीक्षेचे माध्यम व इतर बाबी आयोगाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात येतील.प्रस्तुत जाहिरातीमध्ये भरतीसंदर्भातील संक्षिप्त तपशील दिलेला आहे. अर्ज करण्याची पध्दत, आवश्यक अर्हता, आरक्षण, वयोमर्यादा, शुल्क, निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया इत्यादीबाबतच्या सविस्तर तपशीलासाठी आयोगाच्या www.mpsc.gov.in या वेबसाईटवरील सरळसेवा भरती अंतर्गत 'उमेदवारांना सर्वसाधारण सूचना' मध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहितीचे कृपया अवलोकन करावे. आयोगाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आलेली माहिती व जाहिरात अधिकृत समजण्यात येईल.(अधिक माहितीकरिता परिशिष्ट 'अ' कृपया पहावे ).

६. **कर्तव्ये व जबाबदा-या:-** प्रस्तुत पदाच्या कर्तव्ये व जबाबदा-या याबाबतचा तपशील आयोगाच्या www.mpsc.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

७. **शुल्क : १) अमागास - ४१०/- २) मागासवर्गीय - रु. २१० /-**

८. **अर्ज करण्याची पद्धत :-**

८.१ प्रस्तुत परीक्षेसाठी अर्ज फक्त ऑनलाईन पद्धतीने स्वीकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत.

८.२ पात्र उमेदवाराला वेब-बेस्ड (Web-based) ऑनलाईन अर्ज www.mpsconline.gov.in या वेबसाईटद्वारे **दिनांक ७ मार्च, २०१३ ते २८ मार्च, २०१३ या** कालावधितच सादर करणे आवश्यक राहील.

८.३ ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना आयोगाच्या www.mpsconline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. तसेच ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरण्याचे प्रात्यक्षिक (Demo) सदर वेबसाईटवर पाहता येईल.

८.४ विहित पद्धतीने आयोगास अर्ज सादर केल्यानंतर परीक्षा शुल्क भरल्याशिवाय अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

८.५ आयोगाने निश्चित केलेले परीक्षा शुल्क खालील पद्धतीने भरता येईल :-

(१) भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे (२) क्रेडिट कार्ड (३) डेबिट कार्ड (४) नेटबँकिंग (५) कॅश कार्ड

८.६ विहित पद्धतीने अर्ज सादर करुन परीक्षा शुल्क क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड, नेटबँकिंग अथवा कॅश कार्डद्वारे भरल्यानंतर उमेदवारांच्या मोबाईल क्रमांकावर आयोगास रक्कम प्राप्त झाल्याबाबतचा (Payment Received) एस.एम.एस. आयोगाकडून पाठविण्यात येईल. तसेच उमेदवाराच्या प्रोफाईलमध्ये Application Status द्वारे रक्कम प्राप्त झाल्याबाबत सूचना प्राप्त होईल.

८.७ भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे शुल्क भरल्यावर दोन कार्यालयीन कामकाजाच्या दिवसानंतर (Working Days) उमेदवाराच्या मोबाईल क्रमांकावर आयोगास रक्कम प्राप्त झाल्याबाबतचा एस.एम.एस. आयोगाकडून पाठविण्यात येईल. तसेच उमेदवाराच्या प्रोफाईलमध्ये Application Status द्वारे रक्कम प्राप्त झाल्याबाबत सूचना प्राप्त होईल.

८.८ दोन कार्यालयीन कामकाजाच्या दिवसानंतर आयोगाकडून एस.एम.एस. प्राप्त न झाल्यास अथवा प्रोफाईलद्वारे सूचना प्राप्त न झाल्यास ऑनलाईन अर्ज प्रणालीच्या Feedback द्वारे Registration ID, Transaction ID व चलनावरील बँकेत रक्कम भरल्याचा दिनांक पाठवावा.

८.९ चाळणी परीक्षा घ्यावयाचे ठरल्यास सदर परीक्षेच्या अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम दिनांकानंतर व परीक्षेपूर्वी ७ दिवस अगोदर उमेदवारास प्रवेशप्रमाणपत्र त्याच्या प्रोफाईलद्वारे उपलब्ध करुन देण्यात येईल. त्याची प्रत उमेदवाराने परीक्षेपूर्वी डाऊनलोड करुन घेणे व परीक्षेच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

८.१० परीक्षेच्या वेळी उमेदवाराने प्रवेशप्रमाणपत्र आणणे सक्तीचे आहे. त्याशिवाय, परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही.

९. **विहित पध्दतीने अर्ज सादर करुन शुल्क भरण्यासाठी चलनाची प्रत घेण्याची कार्यवाही दिनांक २८ मार्च, २०१३ रोजी २३.५९ वाजेपर्यंत पूर्ण करणे आवश्यक आहे. त्यानंतर सदर वेबलिंक बंद होईल.**

१०. **चलनाद्वारे परीक्षाशुल्क भरावयाचे झाल्यास भारतीय स्टेट बँकेमध्ये दिनांक ३० मार्च, २०१३रोजी बँकेच्या कार्यालयीन वेळेत भरणे बंधनकारक आहे.**

**ठिकाण : मुंबई** **प्र. दा. अडसुळे**

**दिनांक : ७ मार्च,२०१३** **उपसचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग.**

# Professor in Nephrology

Advertisement No. -361/2013

परिशिष्ट- अ

1) All medical teachers must possess a basic university degree or equivalent qualification included in anyone of the schedules to the Indian Medical Council Act, 1956 (102 of 1956)
2) Medical Teachers must possess the requosite recognised post-graduate medical qualification in their respective subjects.
3) The post graduate qualifications mentioned/prescribed for each post shall be deemed to be amended in accordance with the recognition or de-recognition of such post-graduate qualification by the Medical Council of India from time to time.
4) 50% of the period spent in recognised research in the subject under the Indian Council of Medical Research or in the University or in the Medical College after obtaining post-graduate degree, shall be counted towards teaching experience if the remaining 50% of the period is spent in regular teaching.

GENERAL:

1) Selected candidates will be on probation for a period of two years.
2) For the unreserved post other things beinge equal, preference will be given to candidates belonging to the Backward Classes.
3) There are prospects of promotion to the post of Dean, Joint Director and Director of Medical Education and Research, Mumbai in respective subject.
4) Selected candidates will be required to sign on agreement embodying the conditions of their service including the condition to serve the Govt. for a period of 5 years or to pay a bond penalty of RS. l0000/-(Rs. Ten Thousand) or such other sum as may be prescribed by the Government from time to time.
5) Selected candidates will have to get themselves registered under the Maharashtra Medical Practioners Act, 1961 (Mah. XXVIII of 1961] before joining or his/her name should be borne on the I.M.C. Register under the Indian Medical Council Act, 1956 (CII of 1956), before joining duty.